पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६५। किंमत - ५ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । गुरूवार ०९/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## कर्जमाफी बैठकीवर सरकारचा 'फज्जा'

### शेतकऱ्यांची घोर थट्टा

**सरकारवर रोहित पवार व डॉ. अजित नवले यांचा घणाघात**



मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या विनाअट सरसकट कर्जमाफीच्या मागणीवरून राज्य सरकारवर आमदार रोहित पवार आणि शेतकरी नेते कॉ. डॉ. अजित नवले यांनी जोरदार टीका केली आहे. कर्जमाफीसंदर्भात नेमलेल्या समितीचे प्रमुख प्रवीणसिंह परदेशी यांच्यासोबत सोमवारी सकाळी १०.३० वाजता बैठक निश्चित करण्यात आली होती. मात्र, ठरलेल्या वेळी शिष्टमंडळ उपस्थित असतानाही बैठकीसाठी एकही वरिष्ठ अधिकारी हजर झाला नाही. अखेर ऐनवेळी दूरध्वनीवरून बैठक रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

या प्रकारावर संताप व्यक्त करत रोहित पवार म्हणाले की, हे सरकार किती लबाड, ढोंगी, दांभिक आणि विश्वासघातकी आहे, याचा आज पुन्हा प्रत्यय आला. सरकारच्या आदेशाशिवाय कोणताही अधिकारी अशी हिंमत करू शकत नाही. हा केवळ आमच्या शिष्टमंडळाचा अपमान नसून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या भावना पायदळी तुडवण्याचा प्रकार आहे.

यावेळी अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्यांसमोर प्रतीक्षा करण्याची वेळ आल्याचा उल्लेख करत त्यांनी सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सरकारची ही असंवेदनशील भूमिका अत्यंत निषेधार्ह आहे. कर्जमाफीच्या नावाखाली सरकार केवळ वेळकाढूपणा करत असून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, असा आरोपही त्यांनी केला.

कॉ. डॉ. अजित नवले यांनीही सरकारवर टीका करत सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. अशा वेळी सरकारने जबाबदारीने निर्णय घेण्याऐवजी बैठका रद्द करून शेतकऱ्यांची थट्टा उडवली आहे. हा विश्वासघात शेतकरी विसरणार नाही. (पान ३ वर)

## ९ ऑगस्टला महामार्गावर जनआंदोलन

### नाशिक -पुणे रेल्वेसाठी आरपार संघर्षासाठी तयार रहा - आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राला विकासाच्या नव्या धाग्यात जोडणाऱ्या प्रस्तावित नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाच्या समर्थनार्थ येत्या ९ ऑगस्ट रोजी नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गासह समृद्धी महामार्गावर जनआंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली. हा प्रकल्प रद्द करण्याच्या हालचालींना तीव्र विरोध दर्शविण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या हक्काच्या रेल्वेसाठी एकजुटीने आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार तांबे म्हणाले की, नाशिक-पुणे रेल्वे हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नसून संपूर्ण उत्तर महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक परिवर्तनाचा पाया ठरू शकणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा रेल्वेमार्ग साकार झाल्यास नाशिक, सिन्नर, संगमनेर, जुन्नर, खेड, मंचर आणि चाकण या भागांना थेट रेल्वे संपर्क मिळणार असून या परिसरात उद्योग, व्यापार, शिक्षण, पर्यटन आणि रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील.

सध्या नाशिक-पुणे दरम्यान प्रवासासाठी मुख्यतः रस्ते वाहतुकीवर अवलंबून राहावे लागते. वाढती वाहतूक, वारंवार होणारी कोंडी, अपघात आणि वाढता प्रवासाचा खर्च यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. रेल्वेमार्ग उपलब्ध झाल्यास सुरक्षित, जलद, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल. त्याचबरोबर मालवाहतुकीलाही मोठी गती मिळून कृषी, औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्राला नवे बळ मिळेल.



संगमनेरसारख्या तालुक्यांसाठी हा प्रकल्प विशेष महत्त्वाचा असल्याचे सांगताना तांबे म्हणाले की, रेल्वे आल्यास कृषीमाल, दुग्धव्यवसाय, फळे-भाज्या, औद्योगिक उत्पादने आणि स्थानिक व्यवसायांना राष्ट्रीय बाजारपेठेशी थेट जोडणी मिळेल. विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि व्यावसायिकांना प्रवास अधिक सुलभ होईल. तसेच परिसरात नव्या औद्योगिक गुंतवणुकीस चालना मिळून हजारो युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने Giant Metrewave Radio Telescope (GMRT) परिसरातील दुर्बिणींचे कारण पुढे करून हा रेल्वे प्रकल्प रद्द करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, प्रत्येक विकास प्रकल्पाचा विचार केवळ आर्थिक नफा-तोटच्याच्या निकषावर करता येत नाही. प्रदेशाचा दीर्घकालीन विकास, रोजगारनिर्मिती, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उभारल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

नाशिक आणि पुणे ही दोन्ही शहरे झपाट्याने विस्तारत असून भविष्यात या शहरांवरील नागरीकरणाचा ताण कमी करण्यासाठी मजबूत रेल्वे संपर्क अत्यावश्यक आहे. रेल्वेमुळे दोन्ही शहरांदरम्यान उपग्रह शहरे विकसित होण्यास मदत होईल, तसेच ग्रामीण भागातील युवकांना शिक्षण, (पान ५ वर)

## भंडारदरा पाणलोटात पावसाची दमदार मुसंडी

### भात खाचरे तुडुंब; भंडारदरा धरण ५४ टक्क्यांवर



छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी):

राजूर - उत्तर नगर जिल्ह्याच्या जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सलग चौथ्या दिवशी मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पावसाच्या या दमदार मुसंडीमुळे भंडारदरा धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत असून धरण आता ५४ टक्के भरले आहे. अहमदनगर पाटबंधारे विभागाने ही माहिती अधिकृतपणे जाहीर केली आहे.

'अहमदनगरचे मिनी काश्मीर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भंडारदरा परिसरात गेल्या चार दिवसांपासून पावसाचा अक्षरशः धुमाकूळ सुरू आहे. त्यामुळे आदिवासी भागातील भात खाचरे तुडुंब भरली असून भात लागवडीच्या कामांना मोठा वेग मिळाला आहे. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बुधवारी सकाळपर्यंत भंडारदरा धरणातील पाणीसाठा ५,८९७ दशलक्ष घनफूट इतका झाला असून ब्रिटिशकालीन हे धरण आता निम्म्याहून अधिक भरले आहे. मागील २४ तासांत तब्बल ७१० दशलक्ष घनफूट नव्या पाण्याची आवक धरणात झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाई परिसरातही जोरदार पर्जन्यवृष्टी सुरू आहे. त्यामुळे कृष्णावंती नदी दुथडी भरून वाहू लागली असून या

**रंधा धबधबा पुन्हा दिमाखात कोसळतोय**



छाया - विलास तुपे, राजूर

नदीवरील वाकी धरण ओसंडून वाहत आहे. परिणामी, पर्यटकांचे आकर्षण असलेला रंधा धबधबा पुन्हा दिमाखात कोसळू लागल्याने (पान/र)

## एकदा झालेली चूक पुन्हा होऊ देणार नाही

### कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी यांची ग्वाही

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

राम मंदिरात देणगी चोरीचा प्रकार समोर आल्यानंतर ट्रस्ट आता मोठ्या बदलांची तयारी करत आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी यांचे म्हणणे आहे की, जी चूक झाली, ती पुन्हा होऊ दिली जाणार नाही. यासाठी मंदिराची व्यवस्था मजबूत केली जाईल. एका अनुभवी सीईओ ची नियुक्ती केली जाईल.

एका वृत्तवाहिनीला बोलतांना स्वामी गोविंद देव यांनी मंदिराची २२ जुलै रोजी होणारी ट्रस्टची बैठक, एसआयटी चौकशी आणि नवीन व्यवस्थांबाबत महत्त्वाची माहिती दिली.

यावेळी गोविंद देव यांनी सांगितले की, मंदिराच्या व्यवस्थेत बदल करणे आणि ती अधिक चांगली करणे आता खूप आवश्यक झाले आहे. आम्हालाही ही गोष्ट पूर्णपणे समजली आहे. जी चूक एकदा झाली, ती पुन्हा होऊ नये यासाठी सर्व विभागांमध्ये सुधारणा केल्या जात आहेत. संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि प्रशासकीय शिस्त राखण्यासाठी एक उएज नियुक्त केला जाईल.आमचे जेवढेही विश्वस्त आणि कार्यकर्ते आहेत, ते इतकी मोठी व्यवस्था प्रशासकीय कार्यक्षमतेने आणि कठोरपणे सांभाळण्यासाठी पुरेसे नाहीत. त्यामुळे एका व्यावसायिक सीईओ ची गरज भासली आहे. यासाठी ३ सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे. समिती अनेक लोकांच्या मुलाखती घेऊन ३ नावे ट्रस्टला देईल. यानंतर आम्ही त्यापैकी एका व्यक्तीची निवड करू. सीईओ नेहमी मंदिराची व्यवस्था, देखरेख आणि सुधारणा करण्याचे काम पाहिल. २२ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीपूर्वी सीईओच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. हे काम पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने होईल.

ॲडव्हान्स गोल्ड एस.आय.पी. योजना
२०२६-२७
आजची छोटी बचत... उद्याची मोठी सोन्याची खरेदी!
आताच गोल्ड एस.आय.पी. सुरू करा आणि २०२७ च्या
अक्षयतृतीयेला आपल्या आवडीचे दागिने घरी न्या.
: उपलब्ध योजना :
मजुरी फ्री / एक्स्ट्रा बोनस एस.आय.पी.
फिक्स भाव बुकिंग एस.आय.पी.
फ्लेक्सिबल भाव बुकिंग एस.आय.पी.
SIP ऑनलाईन सुविधा उपलब्ध.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स
OM MAYUR JEWELLERS
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
लकी ड्रॉ आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# रस्त्यात झाड कोसळून वाहतूक ठप्प

## तरुणांच्या मदतीमुळे प्रवाशांना दिलासा


छाया - संदिप शेळके

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील खांडगाव - निमज रस्त्यावर आज बुधवारी पहाटे एक मोठे झाड पावसामुळे उन्मळून पडले. त्यामुळे या मार्गावरची वाहतूक बंद झाली. सकाळी शालेय विद्यार्थी, कामगार, शेतकरी यांची मोठी अडचण निर्माण झाल्याने परिसरातील तरुणांनी घटनास्थळी धाव घेत कुऱ्हाडीच्या साह्याने, कोयत्याच्या साह्याने झाडाच्या फांद्या तोडून रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केला. दुचाकी, छोटी वाहने यांना जागा करून दिली. परंतु झाड मोठे असल्याने त्यासाठी मोठ्या यंत्राची गरज लागणार होती. त्यानंतर याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनाला देण्यात आली. त्यानंतर जेसीबी व कटर मशीनच्या सहाय्याने झाड तोडून बाजूला करण्यात आले. त्यानंतर येथील वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

# मुळा नदीला पूर...

## संगमनेर–पारनेरचा संपर्क तुटण्याची शक्यता

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी उगम पावणाऱ्या मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे मुळा नदीला मोठा पूर आला आहे. मोठ्या वेगाने पाणी मुळा धरणाच्या दिशेने झेपावत असून नदी दुथडी भरून वाहत आहे. पाण्याच्या प्रवाहात सातत्याने वाढ होत असल्याने संगमनेर-पारनेरला जोडणारा मांडवे पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मांडवे पूल हा संगमनेर आणि पारनेर तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. सध्या पुलाखालून अंदाजे १० ते १२ फूट पाणी वाहत असून पाण्याची पातळी वेगाने वाढत आहे. ही वाढ अशीच सुरू राहिल्यास पूल कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाऊ शकतो. त्यामुळे संगमनेर-पारनेर मार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन दोन्ही तालुक्यांतील संपर्क तुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, मुळा नदीला आलेला पूर पाहण्यासाठी नागरिकांनी मांडवे पुलावर मोठी गर्दी केली आहे. अनेक दुचाकी व चारचाकी वाहने पुलावर थांबविल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. संभाव्य धोका लक्षात घेता नागरिकांनी विनाकारण पुलावर गर्दी करू नये किंवा थांबू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# 30 जुलै पर्यंत शाळा सकाळच्या सत्रात भरणार

राज्यात मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त शिक्षकांना पुरेसा वेळ मिळण्यासाठी आता शाळांच्या वेळेत बदल करण्यात येणार आहे. त्यानुसार ३० जुलैपर्यंत राज्यातील शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. मात्र, या आदेशामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत शिक्षक संघटनांकडून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. काही दिवसांपूर्वी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना बीएलओ शिक्षकांबाबत पत्र दिले होते. त्यात ज्या शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी, सलग ठेवाव्यात, बीएलओ म्हणून नियुक्ती नसलेल्या शिक्षकांनी बीएलओ म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या कामात सहाय्य करावे, जेणेकरून शिक्षकांवर अतिरिक्त ताण येणार नाही, असे नमूद करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, बीएलओ असलेल्या शिक्षकांना मतदारयाद्यांचे काम करण्यास वेळ मिळण्यासाठी थेट राज्यातील शाळांचीच वेळ बदलण्यात येणार आहे.

डॉ. पालकर यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, महापालिकांचे प्रशासकीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना दिलेल्या सूचना दिव्या आहेत. त्यानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्य शासकीय, स्थानिक प्राधिकारी, कंत्राटी कर्मचाऱ्यांसोबत शिक्षकांनाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत. विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयाद्या दोषविरहीत, अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण सुमारे २४ वर्षांनंतर राबवण्यात येत आहे. हे काम राष्ट्रीय कर्तव्य असून भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत पार पाडण्यासाठी बीएलओ यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून कामकाज पार पाडण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळावा, काम दिलेल्या कालावधीत पूर्ण व्हावे, कामाचा ताणही येवू नये, यासाठी सर्व शाळा प्रशासनांना आपल्या स्तरावरुन सूचना द्याव्यात. बीएलओ शिक्षकांच्या अध्यापनाचे नियोजन करताना त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी ठेवाव्यात, व त्या प्राधान्याने सलग ठेवून शक्यतो शाळा सकाळच्या सत्रामध्ये भरवण्याचे नियोजन ३० जुलैपर्यंत करावे, संबंधित शिक्षकांना त्यांचे शैक्षणिक कार्य सलग पूर्ण करुन उर्वरित वेळेत बीएलओ म्हणून असलेली जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडता येईल, बीएलओ नसलेल्या शिक्षकांनी आवश्यकतेनुसार बीएलओ असलेल्या शिक्षकांना शैक्षणिक, संबंधित कामकाजामध्ये सहकार्य करावे, तसेच बीएलओ शिक्षकांवर काम पडणार नाही अशा प्रकारे शाळा प्रमुखांनी अंतर्गत कामाचे नियोजन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सर्व सूचना तातडीने अंमलात आणून शाळांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अनुपालन अहवाल शिक्षण संचालनालयास सादर करण्याबाबतही नमूद करण्यात आले आहे.बाबत शिक्षक संघटनांकडून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

# अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरण

## ३८ दोषींची फाशी, ११ जणांची जन्मठेप कायम

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

२००८ च्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मंगळवारी गुजरात उच्च न्यायालयाने अत्यंत महत्वाचा निर्णय सुनावला. विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत उच्च न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली आहे. एवढेच नाही तर, या स्फोटांमध्ये मरण पावलेल्या एकूण ५६ जणांच्या नातलगांना प्रत्येकी १० लाख रुपये, तर २०० हून अधिक जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले आहेत. अहमदाबाद येथे २६ जुलै २००८ रोजी, केवळ ७० मिनिटांत एकापाठोपाठ



एक असे तब्बल २१ बॉम्बस्फोट झाले होते. रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना करण्यात आलं होतं लक्ष्य - हल्लेखोर दहशतवाद्यांनी नरोदा, बापूनगर, सरखेज आणि हटकेश्वर आदी गजबजलेल्या भागांमध्ये हे स्फोट घडवून आणले होते. यासाठी दहशतवाद्यांनी सायकल आणि टिफिन बॉक्सचा वापर केला होता. त्यांनी सायकलवर टिफिन बॉक्समध्ये बॉम्ब पेरून, रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना लक्ष्य केले होते. सुरुवातीच्या स्फोटांनंतर साधारणपणे ४० मिनिटांच्या अंतराने दोन वेगवेगळ्या रुग्णालयांच्या आवारात स्फोट घडवून आणण्यात आले होते.या घटनेच्या १४ वर्षांनंतर अर्थात २०२२ मध्ये सत्र न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. न्यायालयाने हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ' असल्याचे म्हटले होते. एकाच प्रकरणात एवढ्या मोठ्या संख्येने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्याची ही पहिलीच वेळ होती. या विरोधात दोषींनी उच्च न्यायालयात अपील केले होते, तर राज्य सरकारनेही त्यांच्या फाशीच्या शिक्षेला मंजुरी देण्यासाठी याचिका दाखल केली होती. कायद्यानुसार फाशीच्या शिक्षेसाठी साठी उच्च न्यायालयाची मंजुरी आवश्यक असते.

# अतिवृष्टीमुळे अकोले तालुक्यातील शाळा बंदच

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळांना काल मंगळवारी आणि आज बुधवार, दि. ८ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी दि. ८ जुलै रोजी अकोले तालुक्यात काही ठिकाणी अतिवृष्टी, ढगफुटीसदृश परिस्थिती, पूरस्थिती तसेच नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. तसेच तालुक्यातील काही महसूल मंडळांमध्ये आधीच अतिवृष्टी झालेली आहे. ही स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हे आदेश दिले.

अकोले तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळा पावसामुळे बंदच आहे. मात्र, सुट्टीच्या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नेहमीच्या कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनासंबंधीचे कामकाज करावे, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# पूरग्रस्तांना तातडीने मदत, एकाही नुकसानग्रस्ताला वंचित ठेवणार नाही - बावनकुळे

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासन हायअलर्टवर असून, पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहचवली जाईल. कोणत्याही नुकसानग्रस्ताला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांची बैठक घेऊन जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. महसूलमंत्री बावनकुळे यांनी आज नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधत राज्यातील पूरपरिस्थिती, दीक्षाभूमी विकास आराखडा, २२ जुलै रोजीचे महाअभियान आणि राजकीय मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडली. राज्यातील पूरपरिस्थितीचा आढावा घेताना महसूलमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी कालच सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. कोणतीही जीवितहानी होऊ नये, याला सरकारचे पहिले प्राधान्य आहे. महसूल विभागावर नुकसानग्रस्त भागांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, संपूर्ण पंचनामे करून कोणतीही नुकसानभरपाई प्रलंबित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार घरांची पडझड, खावटी आणि



इतर तातडीची मदत तात्काळ वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील पूरपरिस्थितीचा आढावा घेताना महसूलमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. कोणतीही जीवितहानी होऊ नये, याला सरकारचे पहिले प्राधान्य आहे. महसूल विभागावर नुकसानग्रस्त भागांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, संपूर्ण पंचनामे करून कोणतीही नुकसानभरपाई प्रलंबित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल.

# स्वार्थाच्या गणितात अडकलेली नाती

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जीवनात माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असला, तरी भावनिकदृष्ट्या मात्र अधिक गरीब होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्वी नाती प्रेम, विश्वास, आपुलकी आणि त्यागाच्या आधारावर टिकायची; पण आता अनेक नात्यांमध्ये हिशेबाचे गणित शिरले आहे. कोणी किती दिले?, कोणाकडून किती मिळाले?, कोण आपल्या उपयोगाचा आहे? अशा प्रश्नांनी नात्यांतील जिव्हाळ्याची जागा घेतली आहे. त्यामुळे नात्यांचा पाया अधिक कमकुवत होत चालला आहे.




आज अनेक ठिकाणी नाती पैशाच्या तराजूत तोलली जात आहेत. एखाद्या समारंभात कोणी किती पैसे दिले, लग्नात किती आहेर केला, बाळाच्या हातात किती रक्कम ठेवली, यावरून पुढील व्यवहार ठरवला जातो. त्यांनी फक्त शंभर रुपये दिले, मग आपणही तेवढेच देऊ, अशी मानसिकता वाढत आहे. नात्यातील प्रेम, स्नेह आणि आत्मीयतेपेक्षा आर्थिक देवाणघेवाणीला अधिक महत्त्व दिले जात आहे. ही प्रवृत्ती केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती मनामनांतील अंतर वाढविण्याचे कारण ठरत आहे. आजच्या समाजात अनेक जण नातीही स्वार्थाच्या चष्म्यातून पाहू लागले आहेत. ज्यांच्याकडून काही फायदा होईल, अशीच माणसे जवळ ठेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. कोण रेल्वेचे आरक्षण करून देईल, कोण मोठ्या अधिकाऱ्यांकडे ओळख करून देईल, कोण हॉस्पिटलचे बिल कमी करून देईल किंवा अडचणीच्या वेळी उपयोगी पडेल, यावरून संबंध जपले जात आहेत. ज्यांच्याकडून कोणताही भौतिक लाभ होणार नाही, अशा नात्यांकडे दुर्लक्ष केले जाते. ही मानसिकता समाजातील नात्यांचे खरे सौंदर्य हिरावून घेत आहे.

पूर्वीच्या काळात दूरच्या नात्यातील व्यक्तींनाही घरातील सदस्यांप्रमाणेच मान, प्रेम आणि सन्मान दिला जात होता. सण-उत्सव, सुख-दुःख, संकटाच्या प्रसंगी सर्वजण एकत्र उभे राहत असत. आज मात्र अनेकांना नाती म्हणजे अतिरिक्त जबाबदारी वाटू लागली आहे. जास्त संबंध म्हणजे जास्त कटकट असा विचार करून अनेक जण जाणीवपूर्वक नात्यांपासून अंतर ठेवतात. फोन कमी होतात, भेटीगाठी थांबतात आणि हळूहळू नाती केवळ नावापुरती उरतात. ही दुराव्याची प्रक्रिया नकळत समाजाला अधिक एकाकी बनवत आहे. पैसा आणि यश मिळाल्यानंतरही अनेकांच्या नात्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल होतो. आर्थिक प्रगतीबरोबर काहींमध्ये अहंकार वाढतो आणि प्रत्येक व्यक्ती आपल्याशी केवळ पैशासाठी किंवा फायद्यासाठी संबंध ठेवते, असा संशय निर्माण होतो. परिणामी, स्वतःची माणसेही दूर जाऊ लागतात. प्रत्यक्षात प्रत्येक नाते स्वार्थासाठीच असते असे नाही. अनेक नाती प्रेम, विश्वास आणि निस्वार्थ भावनेवर टिकलेली असतात. मात्र संशयाची भिंत उभी राहिली की सर्वांत आधी विश्वासच कोसळतो. सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळेही नात्यांमध्ये कृत्रिमता वाढली आहे. प्रत्यक्ष भेटण्याऐवजी शुभेच्छांचा एक संदेश पाठवून आपले कर्तव्य पूर्ण झाल्याची भावना निर्माण झाली आहे. संवाद कमी होत असल्याने भावनिक जवळीकही कमी होत आहे. नाती टिकवण्यासाठी वेळ, संवाद, समजूतदारपणा आणि परस्पर आदर आवश्यक असतो. यापैकी कोणतीही गोष्ट पैशाने विकत घेता येत नाही.

खरे तर नाती ही व्यवहार नसून भावनांची गुंतवणूक असते. ती जितकी जपली जातात तितकी अधिक समृद्ध होतात. सुखाच्या क्षणी अनेक जण सोबत असतात; पण संकटात खंबीरपणे उभे राहणारी माणसेच खरी नाती जपतात. म्हणून नात्यांचे मूल्य पैशाने नव्हे, तर प्रेम, विश्वास, त्याग आणि सहकार्याने मोजले पाहिजे. आजच्या पिढीने नात्यांकडे केवळ स्वार्थाच्या दृष्टीने न पाहता त्यामागील भावनिक मूल्य समजून घेण्याची गरज आहे. माणूस किती श्रीमंत आहे, यापेक्षा त्याच्याकडे किती प्रेमळ माणसे आहेत, हेच त्याचे खरे वैभव असते. पैसा, पद आणि प्रतिष्ठा आयुष्यात कधीही कमी-जास्त होऊ शकते; मात्र प्रेमाने जपलेली नाती आयुष्यभर साथ देतात. म्हणूनच प्रत्येकाने नात्यांचा हिशेब न करता, मनापासून माणसे जोडण्याचा आणि जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण शेवटी आयुष्याच्या प्रवासात संपत्तीपेक्षा आपल्या माणसांची साथच सर्वात मोठी संपत्ती ठरते.

# हरिश्चंद्रगड परिसरात मुसळधार पाऊस

## मुळा नदीला पूर, कोतुळेश्वर महादेव मंदिर जलमय

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - हरिश्चंद्रगड परिसर, मुळा खोरे, कोतूळ व पिंपळगाव खांड भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मुळा नदी दुथडी भरून वाहत आहे. पिंपळगाव खांड धरण पूर्ण भरल्याने निर्माण झालेल्या फुगवट्यामुळे नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून नदीकाठी असलेले ऐतिहासिक व पुरातन कोतुळेश्वर महादेव मंदिर पूर्णपणे पाण्याने वेढले गेले आहे.



मंदिर परिसरात सुमारे तीन फूट पाणी साचले असून संपूर्ण परिसर जलमय झाला आहे. मंदिरातील शिवपिंडही पूर्णतः पाण्याखाली गेले असून मंदिराच्या सभोवतालचा संपूर्ण परिसर पाण्याने व्यापला आहे. कोतूळ बसस्थानकाकडून मंदिराकडे जाणारा रस्ताही पाण्याखाली गेल्याने भाविकांना दर्शनासाठी जाणे अशक्य झाले आहे. नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे परिसरात सतर्कतेचे वातावरण असून नागरिक नदीकाठी गर्दी करत आहेत.

हरिश्चंद्रगडाच्या डोंगररांगांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरातील ओढे-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे मुळा नदीच्या प्रवाहात मोठी वाढ झाली आहे. पिंपळगाव खांड धरणाच्या फुगवट्यामुळे नदीतील पाण्याचा वेग अधिक वाढल्याने नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोतुळेश्वर महादेव मंदिर हे कोतूळ गावाच्या धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यानंतर मंदिर परिसर जलमय होण्याची परंपरा असली, तरी यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे मंदिरासह शिवपिंड पूर्णतः पाण्याखाली गेल्याचे दुर्मीळ दृश्य पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने पुढील २४ तास अकोले तालुक्यासह घाटमाथ्यावरील भागात मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. प्रशासनाने नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये, पूरग्रस्त भागात जाणे टाळावे तसेच नदीकाठी अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन केले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेरच्या पाणीपुरवठा निविदेची उच्चस्तरीय चौकशी

## आ. खताळ यांनी विधीमंडळात मांडला प्रश्न, दोषींवर होणार कारवाई - राज्यमंत्री

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या कथित अनियमिततेच्या मुद्द्यांवर आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत आवाज उठवला. त्यामुळे या प्रकरणाची अतिरिक्त मुख्य सचिव (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात येणार असून, समितीचा अहवाल दोन महिन्यांत सादर केला जाईल. त्या अहवालानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत केली.




विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे प्रश्न उपस्थित करताना आमदार खताळ यांनी सांगितले की, संगमनेर शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठीची निविदा ५ जून २००९ रोजी दोन जिल्हास्तरीय वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यात आली होती. या निविदेला तब्बल ६९ टक्के वाढीव दराने मंजुरी देण्यात आली होती. महाराष्ट्रात इतक्या उच्च वाढीव दराने मंजूर झालेल्या निविदांचे हे दुर्मिळ उदाहरण असल्याचा दावा त्यांनी केला.

संगमनेर नगर परिषदेमधील सात नगरसेवकांनी या प्रक्रियेला विरोध केला होता. मात्र तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गा तांबे, उपनगराध्यक्षा शोभा पुंड, पाणीपुरवठा सभापती लाला बेपारी तसेच तत्कालीन मुख्याधिकारी योगेश गोडसे यांनी नियमबाह्य पद्धतीने संबंधित ठेकेदार आणि माजी जिल्हा परिषद सदस्य रामहारी (आर. एम.) कातोरे यांना लाभ मिळवून देण्यासाठी संगनमताने ६९ टक्के वाढीव दराने निविदेला मंजुरी दिल्याचा गंभीर आरोप आमदार खताळ यांनी सभागृहात केला.

या प्रकरणात नगरपरिषदेला मोठा आर्थिक फटका बसल्याचे मान्य करण्यात आले आहे. कार्यादेश दिल्यानंतर जवळपास वर्षभराने हा प्रकार समोर आल्याचे सांगून तो नियमबाह्य म्हणता येणार नाही, हा दावा वस्तुस्थितीला धरून नसल्याचे खताळ यांनी स्पष्ट केले. तसेच अतिरिक्त मुख्य सचिवांकडून स्वतंत्र चौकशी करून तत्कालीन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि मुख्याधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, निविदा प्रक्रियेदरम्यानच संचालनालयाने (डीएमए) ६९ टक्के वाढीव दराची गंभीर दखल घेत चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अहवाल मागविण्यात आला. मात्र अहवाल येण्यापूर्वीच संबंधित ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला. जीवन प्राधिकरणाच्या अहवालात ६९ टक्के नव्हे तर ३२ टक्के वाढीव दर असल्याचे नमूद असले, तरी संपूर्ण निविदा प्रक्रियेत अनेक अनियमितता आढळल्याचे स्पष्ट झाले आहे.

या सर्व बाबींचा विचार करून अतिरिक्त मुख्य सचिव (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात येणार असल्याची घोषणा राज्यमंत्री मिसाळ यांनी केली. समितीच्या अहवालानुसार दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार अमोल खताळ यांनी चौकशी अहवालाची मुदत विचारली असता, दोन महिन्यांत समितीचा अहवाल सादर केला जाईल, असे स्पष्ट आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिले.

# समशेरपूर परिसर जलमय नदी-नाल्यांना पूर!



युवावार्ता (प्रतिनिधी) समशेरपूर -

अकोले तालुक्यातील समशेरपूर आणि परिसरात पावसाने जोरदार फलंदाजी केली आहे. गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणीच पाणी झाले आहे. परिसरातील नदी आणि नाले ओसंडून वाहू लागले असून, काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असले, तरी जनजीवन काहीसे विस्कळीत झाले आहे. नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचा चरणसेवा व आरोग्य शिबिर उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - आषाढी वारीतील वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांतर्गत प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणीच्या वतीने राजुरी (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे चरणसेवा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

दि. ७ जुलै रोजी श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे राजुरी येथे आगमन झाले. यावेळी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केलेल्या वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने चरणसेवा करण्यात आली. पायांना औषधी तेलाने मसाज केल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण आणि थकवा कमी होण्यास मदत झाली तसेच पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवउत्साह मिळाला.

चरणसेवेसोबतच वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. आवश्यक औषधांचे मोफत वाटप, प्रथमोपचार सेवा तसेच विविध आरोग्यविषयक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सर्व वारकऱ्यांना आपुलकीने, तत्परतेने आणि समर्पित भावनेने चरणसेवा व आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

चरणसेवा या सेवाभावी उपक्रमामुळे पुढील प्रवासाला मोठा आधार मिळाल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष तसेच प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# कर्जमाफी बैठकीवर...

पान १ वरून -

यावेळी रोहित पवार यांनी राज्यातील शेतकऱ्यांना आवाहन करत म्हटले की, येणारे वर्ष शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण ठरण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे फसव्या कर्जमाफी योजनेविरोधातील हा लढा केवळ आम्हीच नव्हे, तर प्रत्येक शेतकऱ्याने पुढे नेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठीचा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल.

दरम्यान, बैठकीच्या ऐनवेळी झालेल्या रद्दबातल निर्णयामुळे शेतकरी संघटना आणि शिष्टमंडळातील सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, सरकारने तातडीने शेतकरी कर्जमाफीबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# चंदनापुरी घाटात दरड कोसळली

## अनर्थ टळला, यंत्रणेच्या तत्परतेमुळे वाहतूक सुरळीत

युवावार्ता (प्रतिनिधी) -

संगमनेर - तालुक्यातून जाणाऱ्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील चंदनापुरी घाटात मंगळवारी (दि.७) दुपारी मोठ्या प्रमाणात दरड कोसळून थेट महामार्गावर आली. सुदैवाने त्यावेळी संबंधित मार्गावर कोणतेही वाहन नसल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र पोलीस व यंत्रणेच्या तत्पर कारवाईमुळे महामार्गावरील वाह तूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.



चंदनापुरी घाट हा दरवर्षी पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या घटनांसाठी संवेदनशील मानला जातो. डोंगरावरील दरडी महामार्गावर कोसळू नयेत म्हणून संबंधित विभागाने दोन्ही बाजूंना लोखंडी जाळ्या बसवल्या आहेत. मात्र अनेक ठिकाणी या जाळ्यांमध्ये मोठमोठे दगड अडकले असून काही ठिकाणी दरडी जाळ्या तोडून थेट महामार्गावर येत असल्याच्या घटना घडत आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या भीज पावसामुळे डोंगराच्या कपारींमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी झिरपल्याने माती व दगड सैल झाले आहेत. त्यातून मंगळवारी दुपारी या मार्गावर छोट्या-मोठ्या दरडी कोसळल्या. मोठमोठे दगड रस्त्यावर आल्याने काही काळ वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. मात्र त्यावेळी कोणतेही वाहन त्याठिकाणी नसल्याने संभाव्य अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच डोळासणे पोलीस मदत केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रावसाहेब बांबळे यांच्यासह सागर दुशिंगे, गणेश सदगीर व खंडेराव रहाणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

# श्रीरामपूर विभागात ६८ सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

## गुन्हेगारीविरोधात पोलिसांचे झिरो टॉलरन्स धोरण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने गुन्हेगारी टोळ्या आणि सराईत गुन्हेगारांविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबिले असून, त्याअंतर्गत श्रीरामपूर विभागात सन २०२५ व २०२६ या कालावधीत एकूण ६८ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ५५ व ५६ अन्वये हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सक्रीय गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाया प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर विभागातील श्रीरामपूर शहर, श्रीरामपूर तालुका, राहुरी, नेवासा, सोनई, कोपरगाव शहर, राहाता, शिर्डी, संगमनेर, अकोले, घारगाव व लोणी आदी पोलीस ठाण्यांनी सातत्याने गंभीर स्वरूपाचे मालमत्तेविरुद्ध व शरीराविरुद्धचे गुन्हे करणाऱ्या तसेच सार्वजनिक शांततेस बाधा पोहोचविणाऱ्या सराईत आरोपींविरुद्ध तडीपारीचे प्रस्ताव सादर करून कारवाई केली.

महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ अंतर्गत ४४ सराईत गुन्हेगारांना एक वर्ष, दोन वर्षे किंवा सहा महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांच्या गुन्हेगारी स्वरूपानुसार श्रीरामपूर, राहाता, राहुरी, नेवासा, नगर तालुका, संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा तसेच काही प्रकरणांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुका व नाशिक जिल्ह्यातील निफाड, येवला, सिन्नर तालुक्यांतून हद्दपार करण्यात आले आहे. या कारवाईत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोमनाथ भाऊराव कुदळे, अरबाज एजाज बागवान, अरबाज आयुब पठाण, मनोज संजय साबळे ऊर्फ मनोहर साबळे, सौरभ संजय - शिंदे, सागर भाऊसाहेब कुदळे, ओंकार शंकर साळवे ऊर्फ भोला साळवे, जी - शान अब्दुल गणी शेख, मोसिन ऊर्फ बंदी इसा कुरेशी, दीपक बबन जाधव, - बबलू दिलीप शेळके यांच्यासह राहुरी, श्रीरामपूर तालुका, नेवासा, सोनई, कोपरगाव, राहाता, शिर्डी, संगमनेर, अकोले व घारगाव पोलीस ठाण्यांतील अनेक सराईत गुन्हेगारांचा समावेश आहे.



कलम ५५ अंतर्गत सहा गुन्हेगारी टोळ्यांमधील २४ सदस्यांवरही सामूहिक हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये श्रीरामपूर शहरातील अब्दुल गणी कुरेशी व एजाज कादर कुरेशी, अरबाज मस्तान शेख व गौरव रमेश सोनटक्के यांच्यासह राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दीपक बबन लाटे, निखिल बबन लाटे, शहादेव विठ्ठल माने, अभिषेक राजेंद्र नाचणे, गणपत बबन गफले, संदीप गोपीनाथ लाटे, अक्षय मच्छिंद्र कुसमुडे, आकाश अशोक मंडलिक व राहुल अंबादास पिटेकर यांचा समावेश आहे.

लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फैजान जब्बार कुरेशी (टोळी प्रमुख), मुन्तजीर मुनिर कुरेशी, अब्दुलकरीम अमिर कुरेशी, मुनिर अमिर कुरेशी, जब्बार हसन कुरेशी, नाजीम आयुब कुरेशी वसीम आयुब कुरेशी व रिजवान मेहकु कुरेशी या आठ सदस्यांच्या टोळीला दीखता वर्षासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सागर ऊर्फ मोद्या रामदास मंजुळ (टोळी प्रमुख), अतुल देविदास आव्हाड व भारत भाऊसाहेब आव्हाड या टोळी सदस्यांवरही एक वर्षासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, हद्दपार करण्यात आलेल्या व्यक्तींनी आदेशाचे उल्लंघन करून प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश केल्यास त्यांच्याविरुद्ध तात्काळ गुन्हा नोंदवून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अत्यावश्यक कारणास्तव हद्दपार कालावधीत प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश करावयाचा असल्यास संबंधित व्यक्तींनी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

हद्दपार केलेल्या व्यक्ती प्रतिबंधित क्षेत्रात वावरत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी, संबंधित पोलीस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्यांशी किंवा जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाच्या ०२४१-२४१६१३२ अथवा ०२४१-२४१६१३८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले आहे.

श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

।। शिवमस्तु सर्व जगतः ।।

रजि.नं.ए.एन.आर./एस.एन.आर./आर.एस.आर./सी.आर २६५८/९९ रजि. दि. १२/१०/१९९९

**श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर**

कार्यालय : मालाणी निवास, बाजारपेठ, संगमनेर, जि. अहमदनगर, फोन : २२७८५५
विस्तारित कक्ष : मौनी कॉम्प्लेक्स, जाणता राजा मैदान रोड, विद्यानगर, संगमनेर, फोन : २२४९५५

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस** (फक्त सभासदांसाठी)

**श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर**, ता. संगमनेर, जि. अ.नगर या संस्थेची **२७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१९/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. श्री. मु. र. भंडारी मंगल कार्यालय, अशोक चौक, संगमनेर** या ठिकाणी संस्थेचे विद्यमान **चेअरमन सीए श्री. हर्षल राजेंद्र गुंदेचा** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सन्माननीय सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ चा ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे. (पान.नं.६ वर)
४) सन २०२५-२६ चा शासकीय ऑडीट रिपोर्टची नोंद घेणे.
५) सन २०२४-२५ च्या ऑडीट दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२६-२७ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२५-२६ अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८) सन २०२६-२७ सालाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
९) सन २०२६-२७ सालाकरिता लोकल ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरवणे.
१०) संस्थेच्या कार्यालयासाठी जागा खरेदी करण्याबाबत विचार विनिमय करणे.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा. अध्यक्षसाहेबांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

स्थळ : संगमनेर
दि. ०५/०७/२०२६

आपला विश्वासू
**रमेश रा. सातपुते** - मॅनेजर
(मा. संचालक मंडळाच्या आदेशाने)

**टिप** : १) कोरम अभावी सभेचे कामकाज तहकुब झाल्यास अर्धा तास थांबून सभेचे कामकाज त्याच ठिकाणी त्याच दिवशी पूर्ण केले जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती सर्वसाधारण सभेमध्ये पाहिजे असल्यास तसेच प्रश्न व सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि. १५/०७/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी कळवाव्यात.
३) कृपया सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी. ४) अर्थिक पत्रकांचा सविस्तर तपशिल संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केला आहे.

२७ वा वार्षिक अहवाल

# संपादकीय...

## पुण्यतिथी...

## ज्ञानेश्वरीचे संशोधक सोनोपंत दांडेकर



ह.भ.प. सोनोपंत उर्फ मामासाहेब दांडेकर हे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मूळ नाव शंकर वामन दांडेकर असे होते. श्री ज्ञानेश्वरीचे संशोधक, संपादक, संतवाङ्मयाचे अभ्यासक, तत्त्वज्ञ, प्रख्यात प्रवचनकार आणि वारकरी संप्रदायाचे प्रभावी विचारवंत म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी आयुष्यभर संत साहित्याचा अभ्यास, ज्ञानेश्वरीचा प्रसार आणि समाजप्रबोधनाचे कार्य निष्ठेने केले.

त्यांचा जन्म २० एप्रिल १८९६ रोजी ठाणे जिल्ह्यातील केळवे येथे एका सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबात झाला. दांडेकर कुटुंबाचे मूळ वास्तव्य केळवे-माहीम येथे होते. त्या काळात मलेरियाच्या साथीमुळे कुटुंब केळवे येथील वाडीत राहत असल्याने त्यांचा जन्म तेथे झाला. अवघ्या दीड वर्षांचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. या दुःखद प्रसंगानंतर त्यांच्या वडिलांनी त्यांच्या शिक्षण, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाकडे विशेष लक्ष दिले. सोनोपंतांचे प्राथमिक शिक्षण केळवे-माहीमच्या प्राथमिक शाळेत झाले. पुढे १९०५ मध्ये ते पुण्यातील नूतन मराठी विद्यालयात दाखल झाले आणि १९१२ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयातून १९१७ मध्ये बी.ए. पदवी संपादन केली. त्यांना मुंबई विद्यापीठाची प्रल्हाद सीताराम शिष्यवृत्ती मिळाली आणि गुरुदेव रा. द. रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो या विषयावर अभ्यास करून त्यांनी १९१९ मध्ये एम.ए. पदवी प्राप्त केली. विद्यार्थीदशेतच त्यांचा परिचय विष्णू नरसिंह जोग अर्थात जोग महाराज यांच्याशी झाला. जोग महाराज हे वारकरी संप्रदायातील थोर संत आणि लोकमान्य टिळकांचे निकटवर्ती सहकारी होते. त्यांच्या सहवासातून सोनोपंतांना हरिभक्ती, देशभक्ती, ज्ञानेश्वरी आणि संतसाहित्याची गोडी लागली. पुढे त्यांनी श्री ज्ञानेश्वरीचे संशोधन, संपादन आणि लोकाभिमुख सादरीकरण करून संतवाङ्मयाचा अभ्यास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांच्या साहित्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला आणि ज्ञानेश्वरीतील गहन तत्त्वज्ञान सोप्या भाषेत मांडले.

सोनोपंत दांडेकर यांनी आयुष्यभर पंढरपूरची आषाढी आणि कार्तिकी वारी कधीही चुकवली नाही. त्यांच्या वारीचा उद्देश केवळ धार्मिक नव्हता, तर समाजप्रबोधन हा होता. वारकऱ्यांचे प्रबोधन, अंधश्रद्धांचे निर्मूलन, धर्मग्रंथांचा योग्य अर्थ लोकांपर्यंत पोहोचविणे, कीर्तनसंस्थेचे पुनरुज्जीवन, लोकशिक्षणाचा प्रसार, नैतिक मूल्यांची जपणूक आणि भक्तीबरोबर विवेकाचा संदेश देणे हे त्यांच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. ते एक उत्कृष्ट शिक्षक, अभ्यासू तत्त्वज्ञ आणि प्रभावी वक्ते होते. ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, उपनिषदे आणि भारतीय तत्त्वज्ञानावर त्यांनी अनेक संशोधनपर ग्रंथ, भाष्ये व प्रवचने दिली. ९ जुलै १९६८ रोजी या महान संतसाहित्य अभ्यासक, ज्ञानेश्वरी संशोधक आणि वारकरी संप्रदायाच्या तेजस्वी विचारवंताचे निधन झाले.

# भंडारदरा पाणलोटात...

पान १ वरून - परिसराचे निसर्गसौंदर्य खुलून आले आहे. वाकी धरण भरल्यामुळे लवकरच निळवंडे धरणाकडेही मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू होण्याची शक्यता आहे. सध्या निळवंडे धरणात २,२८२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून धरण २७.३८ टक्के भरले आहे. गत १२ तासांतील पर्जन्यमान असे :

घाटघर - २५९ मिमी, रतनवाडी - १५३ मिमी, पांजरे - १२३ मिमी, वाकी - ८९ मिमी, भंडारदरा - ८३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आगामी काही दिवसांत भंडारदरा धरणातील पाणीसाठ्यात आणखी लक्षणीय वाढ होण्याची शक्यता असून उत्तर नगर जिल्ह्यासाठी ही अत्यंत दिलासादायक बाब मानली जात आहे.

# जिल्हा परिषद शाळेला तीन संगणक भेट स्थानिक भूमीपुत्रांनी केली अमेरिकेतून मदत



संगमनेर (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मिशन आपुलकी अंतर्गत हिवरगाव पावसा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला अमेरिकेतील कमिन्स इंक. (कोलंबस, इंडियाना) येथे अभियंता म्हणून कार्यरत असलेले सुयोग गुंजाळ यांनी आयसीटी लॅबसाठी तीन संगणक संच भेट दिले.

शाळेचे माजी विद्यार्थी प्रवीण सुभाष गडाख यांच्या माध्यमातून ही मदत मिळाली असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना संगणकाचे प्राथमिक ज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे धडे घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शिक्षणाशी जोडण्याचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे.

यावेळी प्रवीण गडाख यांनी भविष्यातही शाळेसाठी संगणक उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक आर. पी. रहाणे यांनी शाळेत सुसज्ज आयसीटी लॅब, ग्रंथालय आणि प्रयोगशाळा उभारण्याचा मानस व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन डिजिटल शिक्षणाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाबद्दल गटशिक्षणाधिकारी श्री. गुंड, विस्तार अधिकारी श्रीमती नंदा वलवे, केंद्रप्रमुख स्मिता धनवटे यांनी सुयोग गुंजाळ व प्रवीण गडाख यांचे अभिनंदन केले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे स्वागत करून योगदानकर्त्यांचे कौतुक केले.

# जि.प. कळस बुद्रूक शाळेचा शिष्यवृत्ती परिक्षेत दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

कळस- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कळस बुद्रुक येथील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. शाळेचा एकूण निकाल ४४% लागला असून, यंदा शाळेतील दोन विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले आहेत, तर एकूण २७ विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले आहेत.

जिल्हा गुणवत्ता यादीत ईश्वरी प्रकाश बिबवे हिने २४२ गुण मिळवत शाळेतून प्रथम स्थान पटकावले, तर शार्विल मीनानाथ खराटे याने २३६ गुणांसह द्वितीय स्थान मिळवत गुणवत्ता यादीत स्थान निश्चित केले. या दोघांच्या यशाने संपूर्ण शाळेला अभिमान वाटावा असे कार्य केले आहे.

नशिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये हुलवळे मानसी जयराम (२२४), वाकचौरे श्रावणी भीमाशंकर (२२२), कातोरे वेदांत शिवाजी (२२०), ढगे ऋत्वा महेश (२१८), वाकचौरे सौम्या प्रशांत (२०२), वाकचौरे अपेक्षा अमोल (१९४), साबळे ध्रुव गणेश (१८८), सय्यद मंतशा इम्रान (१८२), वाकचौरे आर्या अनिल (१७४), झोडगे साईश गणेश (१७४), ढगे तेजस्विनी रमेश (१७०), चव्हाण अगस्त्य सदानंद (१६६), वाकचौरे अभिजित राजेंद्र (१६०), चौधरी साईश सीताराम (१६०), वाकचौरे संयुरी आदिनाथ (१५६), चव्हाण दुर्वा संतोष (१५२), घाणे कृष्णा गोपीनाथ (१५०), फापाळे प्रांज्वल चंद्रकांत (१५०), झोडगे रितीष्का संतोष (१५०), वाकचौरे मानसी दिपक (१४२), भुसारी वैष्णवी संतोष (१४०), गवांदे परी आनंद (१३६), शिर्के त्रिशा दिपक (१३६), हुलावळे हर्षदा अजित (१३०) व मोहिले ओम बाळासाहेब (१२०) यांचा समावेश आहे.

हे यश केवळ योगायोग नाही, तर विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे. रोज शाळेच्या वेळेव्यतिरिक्त जादा तास घेऊन सराव करून घेण्यात आला. सुट्टीच्या दिवशीही विद्यार्थ्यांना बोलावून सराव परीक्षा घेतल्या गेल्या. मिशन आरंभ उपक्रमांतर्गत घेतलेल्या सराव परीक्षांचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा सराव, वेळेचे नियोजन आणि आत्मविश्वास मिळाला.

या यशामागे वर्गशिक्षिका श्रीमती माधवी गोरे मॅडम आणि श्रीमती अनुराधा नेहे मॅडम यांची मेहनत विशेष उल्लेखनीय आहे. या दोन्ही शिक्षिकांनी विद्यार्थ्यांची अत्यंत परिश्रमपूर्वक तयारी करून घेतली. नियमित सराव, वेळोवेळी उजळणी, वैयक्तिक मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या या समर्पणामुळेच शाळेला हे यश मिळवता आले, याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन होत

# युद्ध पुन्हा भडकणार? अमेरिकेचे हवाई हल्ले

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या मिडिल ईस्ट पुन्हा एकदा युद्ध भडकण्याची भीती आहे. ,स्ट्रेट ऑफ होर्मुज परिसरातील ३ कमर्शियल जहाजांवर झालेल्या हल्ल्यांनंतर अमेरिकन सैन्याने थेट इराणच्या हद्दीत घुसून मोठे हवाई हल्ले केले आहेत. इराणच्या सरकारी मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार, होर्मुज तटाजवळील इराणी भूप्रदेशात अनेक शक्तिशाली स्फोट झाले आहेत. यात प्रामुख्याने केशम बेटावर ६, सिरिक शहरात ७ आणि इराणचे प्रमुख बंदरगाह शहर बंदर अब्बास येथे अनेक मोठे धमाके झाले आहेत. अमेरिकेच्या या नव्या लष्करी कारवाईमुळे दोन्ही देशांमधील तणाव शिगेला पोहोचला असून, युद्ध कायमचे संपवण्यासाठी आणि शांतता करार करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे.

'यूएस सेंट्रल कमांड'ने या हल्ल्यांची पुष्टी केली आहे. अमेरिकन लष्कराने स्पष्ट केले आहे की, हे जोरदार हल्ले आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारी मार्गावरून जाणाऱ्या जहाजांवर इराणने केलेल्या हल्ल्यांच्या प्रत्युत्तरादाखल करण्यात आले आहेत. व्यापारी जहाजांना लक्ष्य करणाऱ्यांना आणि त्यांच्यावर हल्ले करणाऱ्यांना याची मोठी किमत चुकवावी लागेल.दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेवर दोन्ही देशांमध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे वारंवार उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. इराणने म्हटले आहे की, अमेरिका या कराराचे उल्लंघन करून जे परिणाम घडवून आणत आहे, त्याबाबत आम्ही त्यांना गंभीर इशारा देत आहोत. इराण आपल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि हिताच्या रक्षणासाठी अत्यंत कठोर पावले उचलण्यास सक्षम आहे.

# नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून १२ हजार ६२० क्युसेक्स विसर्ग

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून आज सकाळी ९ वाजल्यापासून गोदावरी नदीपात्रात १२ हजार ६२० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, तसेच नदीपात्रातील साहित्य व जनावरे तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावीत, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाच्या पूर नियंत्रण कक्षाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले आहे.

आज सकाळी बंधाऱ्यातून ६ हजार ३१० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन सकाळी ९ वाजता त्यामध्ये वाढ करून विसर्ग १२ हजार ६२० क्युसेक्स करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण कायम राहिल्यास विसर्गात टप्प्याटप्प्याने आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने गोदावरी नदीपात्रालगतच्या परिसरातील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, नदीपात्रात कोणतेही साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावीत. तसेच पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# आषाढी वारीतील आरोग्य सेवा शिबिरासाठी स्वयंसेवकांना टी-शर्ट - टोपींचे वितरण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पंढरपूर आषाढी वारी २०२६ निमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेवा शिबिर व चरणसेवा उपक्रमासाठी कार्यरत स्वयंसेवक डॉक्टर व रुग्णमित्रांना टी-शर्ट व टोपींचे वितरण निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते करण्यात आले. या साहित्याचे वितरण संबंधित रुग्णालय व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना करण्यात आले.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना आरोग्य सेवा, प्रथमोपचार व चरणसेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वयंसेवकांची ओळख सहज व्हावी तसेच सेवाकार्य अधिक सुसूत्रपणे पार पडावे, या उद्देशाने टी-शर्ट व टोपींचे वितरण करण्यात आले. यावेळी तहसीलदार श्रीमती शोभा पुजारी, माहिती अधिकारी अमोल महाजन, सहाय्यक महसूल अधिकारी स्वप्नील फलटणे, महसूल सहाय्यक साईनाथ उप्पोड, संतोष साळवे, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, विळदघाट येथील श्रीमती काळे, डॉ. रेहान शाह तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, अहिल्यानगरचे स्वप्नील कच्छवे आदी उपस्थित होते.


**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर)
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**पाहिजेत**
प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397









**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

# लहीत खुर्द - लहीत बुद्रुक संपर्क तुटला

## मुळा नदीला पूर, वादळी पावसामुळे अनेक गावांचा वीजपुरवठा खंडित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील लहीत खुर्द आणि लहीत बुद्रुक या गावांना जोडणाऱ्या नदीवरील पुलावरून पाणी वाहू लागल्याने दोन्ही गावांमधील संपर्क तात्पुरता पूर्णपणे तुटला आहे. मुळा नदीच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने पुल पूर्णपणे पाण्याखाली गेला असून वाहतूक अत्यंत धोकादायक बनली आहे.

हरिश्चंद्रगड, कुमशेत आणि पाचनई परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुळा नदीला मोठा पूर आला आहे. या पावसाचा परिणाम म्हणून पिंपळगाव धरणावरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग मुळा धरणाच्या दिशेने सुरू असून नदीच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे लहीत खुर्द-लहीत बुद्रुक जोडणारा पूल पाण्याखाली गेला असून दोन्ही गावांमधील संपर्क पूर्णपणे खंडित झाला आहे.



याच पुराचा फटका कोतूळ येथील ऐतिहासिक कोतुळेश्वर महादेव मंदिरालाही बसला असून मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. कोतुळेश्वर मंदिर सुमारे पाच फूट पाण्याखाली गेले असून परिसर जलमय झाला आहे. मंदिराचे हे निसर्गरम्य दृश्य पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत असली तरी प्रशासनाने नदीकाठ व पूरग्रस्त भागात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे कोतूळ परिसरातही मोठे नुकसान झाले आहे. कोहने, कोतूळ, ब्राह्मणवाडा, वाघापूर, लिंगदेव आदी गावांना वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणच्या उपकेंद्राअंतर्गत अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने व तारा तुटल्याने या परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला आहे. महावितरणचे अधिकारी व कर्मचारी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम करत असून पावसामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तसेच ग्रामस्थांनी नागरिकांना पुलावरून कोणत्याही परिस्थितीत ये-जा करू नये, असे आवाहन केले आहे. विशेषतः शेतकरी, विद्यार्थी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांनी जीव धोक्यात घालून पूरग्रस्त पुल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

हवामान विभागाने परिसरात आणखी मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने नदीच्या पाण्याची पातळी आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, सुरक्षित ठिकाणी राहावे आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागरिकांना महावितरणचे आवाहन

## पावसाळ्यात वीज सुरक्षिततेचे नियम पाळा



अमोल आभाळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्या राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर वीज अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे की, पावसाळ्यात तुटलेल्या वीजतारा, वाकलेले वीज खांब, रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तसेच इतर विद्युत उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखावे. अशा ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत स्पर्श करू नये. तुटलेली वीजतार आढळल्यास तात्काळ महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा १९१२, १८००-२१२-३४३५ अथवा १८००-२३३-३४३५ या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती द्यावी. पावसामुळे पाण्याखाली गेलेल्या भागात विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. घरात पाणी शिरल्यास मुख्य वीजपुरवठा (मेन स्विच) त्वरित बंद करावा. ओल्या हाताने स्विच, प्लग किंवा कोणतेही विद्युत उपकरण हाताळू नये. वीजपुरवठा खंडित झाल्यास स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न न करता अधिकृत महावितरण कर्मचाऱ्यांमार्फतच दुरुस्ती करून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

तसेच वीजतारांवर झाडांच्या फांद्या पडल्याचे दिसल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. शेतातील वीजपंप सुरू करण्यापूर्वी वीजजोडणी सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. अफवांवर विश्वास न ठेवता महावितरण व स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे श्री. आभाळे यांनी म्हटले आहे.

तुटलेली वीजतार दिसल्यास दूर रहा, स्पर्श करू नका आणि तात्काळ महावितरणला कळवा, असा संदेश देत श्री. अमोल आभाळे यांनी सर्व वीज ग्राहकांनी स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता जपण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

# कोंडाजी शिंदे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - सुगाव बु, ता. अकोले येथील प्रगतशील शेतकरी कोंडाजी महादू शिंदे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते ७० वर्षाचे होते.

कै. कोडिबा महादू शिंदे हे अशिक्षित असूनही त्यांनी पारंपारिक शेतीसाठी अनुभव कौशल्याने मोठे यश मिळवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, पुतणे,३ मुली, जावई ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. येथील विद्वेश शिंदे यांचे ते वडील होत. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# ९ ऑगस्टला महामार्गांवर...

पान १ वरून -

रोजगार आणि उद्योगांच्या नव्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे हा प्रकल्प संपूर्ण प्रदेशाच्या संतुलित विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

रेल्वेसारखे पायाभूत सुविधा प्रकल्प शतकातून एकदाच उभे राहतात. आज घेतलेला निर्णय पुढील अनेक पिढ्यांचे भविष्य घडवणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत मार्गी लागला पाहिजे, असे ठाम मत आमदार तांबे यांनी व्यक्त केले.

यावेळी त्यांनी नाशिक, संगमनेर, सिन्नर, जुन्नर, खेड, मंचर, चाकण तसेच संपूर्ण परिसरातील नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, उद्योजक आणि विविध सामाजिक संघटनांना ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जनआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन नाशिक-पुणे रेल्वेच्या समर्थनार्थ एकजुटीने आवाज उठविण्याचे आवाहन केले.

# दोन फुटांवर मृत्यूचा थरार !

## क्षीरसागर दाम्पत्य थोडक्यात बचावले नऊ वर्षांपूर्वीच्या दुर्घटनेची आठवण ताजी

### झाडांच्या फांद्यांमुळे पुन्हा तुटली उच्चदाब वीजवाहिनी; दोन विभागांच्या ढकलाढकलीत शेतकरी व विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

**घटनेनंतर तातडीने कर्मचारी पाठवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. मात्र झाडे पूर्णपणे हटविण्यासाठी पाटबंधारे विभागाची परवानगी आवश्यक आहे.**

**अक्षय विखे**
**अभियंता, वीज वितरण कंपनी आश्वी**

**या झाडांबाबत अनेक वेळा मागणी करूनही दखल घेतली जात नाही. भविष्यात दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित दोन्ही विभागांवर राहील. गरज पडल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.**

**सतीश गायकवाड**
**सामाजिक कार्यकर्ते, आश्वी खुर्द**

**नऊ वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याचा बळी गेला... आता क्षिरसागर दाम्पत्य थोडक्यात बचावले... आणखी किती जीव धोक्यात घातल्यानंतर प्रशासन जागे होणार?**

**कैलास गायकवाड**
**सामाजिक कार्यकर्ते आश्वी खुर्द**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळा सुरू होताच आश्वी खुर्द परिसरात विजेच्या तारा तुटण्याच्या घटना पुन्हा समोर येत आहेत. रविवारी (दि. ५ जुलै) सकाळी सुमारे ९ वाजता गायांसाठी चारा कापत असताना आश्वी खुर्द ता. संगमनेर येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ क्षिरसागर (वय ४४) व त्यांच्या पत्नी योगिता क्षिरसागर (वय ३८) यांच्या अवघ्या दोन फुटांवर उच्चदाब वीजवाहिनी तुटून कोसळली. तारेला असलेल्या रबराच्या आवरणामुळे आणि दोघेही काही अंतरावर असल्याने मोठा अनर्थ टळला. क्षणभरात मृत्यू समोर उभा ठाकल्याचा थरारक अनुभव या दाम्पत्याने घेतला.

ही घटना जगुमाई-पाचमोऱ्या ओढा परिसरात, आश्वी माळेवाडी रस्ता असलेल्या प्रवरा उजव्या कालव्यालगत क्षिरसागर यांच्या शेता लगत घडली. मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज, हवेत ठिणग्या आणि काही क्षण अंधारी येताच त्यांच्या समोर मुख्य वीजवाहिनी जमिनीवर पडलेली दिसली. सुदैवाने तारेला रबराचे संरक्षण असल्याने मोठी जीवितहानी टळली.



विशेष म्हणजे, याच परिसरात नऊ वर्षांपूर्वी शेतकरी रमेश लहानू शिंदे यांचा तुटलेल्या विजेच्या तारेचा स्पर्श झाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून जुनी दुर्घटना पुन्हा सर्वांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली आहे. घटनेची माहिती रामनाथ क्षिरसागर यांनी तातडीने वीज वितरण कंपनीचे हर्षल गडगे गणेश गायकवाड तान्हाजी सांगळे यांच्याशी संपर्क साधला. असता ते घटनास्थळी दाखल होऊन झाडांच्या फांद्या तोडत वीजपुरवठा सुरळीत केला.

मात्र मूळ प्रश्न आजही कायम आहे. आश्वी खुर्द उपकेंद्रातून हंगेवाडी व शेडगावकडे जाणाऱ्या शेतीच्या वीजवाहिन्यांखाली मोठमोठी झाडे वाढली आहेत. वारा, पाऊस किंवा वादळ सुरू होताच फांद्या तारांवर पडून अशा घटना घडतात. या मार्गावरून दररोज शेतकरी, ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थी ये-जा करतात. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. वीज वितरण कंपनी झाडे पाटबंधारे विभागाची असल्याचे सांगते, तर पाटबंधारे विभाग वीज वितरण कंपनीची जबाबदारी असल्याचे सांगून हात झटकत आहे. दोन विभागांच्या या ढकलाढकलीत सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थ करणार आहेत.

# भक्ती, समता आणि आनंदाचा महासागर




एआय फोटो

पंढरीची वारी, पंढरीची दिंडी म्हणजे भक्तीचा महासागर. आभाळाला सुद्धा ओढ या पंढरीची लागली. आकाशातील मेघांनी सुद्धा वारकरी बंधू-भगिनींवर अमृताच्या धारांचा वर्षाव केला. वारकऱ्यांच्या अंगावर पडलेला अमृताचा सडा हा थेट पंढरीला विठुरायाकडे घेऊन जाईल ही आभाळाची धारणा. खरोखर हा पालखी सोहळा म्हणजे स्वर्गीय आनंद. आनंदाचे डोही आनंदी तरंग. रंगी रंगला पांडुरंग. या पालखी सोहळ्यामध्ये १८ पगड जातीच्या बांधवांनी भगिनींनी पांडुरंगाचा रंग आपल्यावर उडवून घेतला आहे. पांडुरंगाचा रंग इतका पक्का आहे की तो कधीही जात नाही. हा भक्तीचा रंग आहे. हा श्रद्धेचा रंग आहे. हा विश्वासाचा रंग आहे. या पालखी सोहळ्यामध्ये असलेले सर्व वारकरी यांच्याशी बोलताना एक जाणवले की, कितीही असू दे प्रवास, कितीही असू दे त्रास, परंतू वारी चुकवायची नाही. १८ पगड जातीची सर्व माणसे राम कृष्ण हरी या मंत्राने जोडले जातात. ही आध्यात्मिक लोकशाही आहे. आपली आत्मिक उन्नती, आपले शरीर ,आपलं मन आपल्याला उन्नत करायचे असे वाटत असेल तर या पालखी सोहळ्यामध्ये निश्चितच सहभाग घेऊन हा आनंद कंद अनुभवावा. हा आनंदकंद कच्चा पचत नाही. तर त्याला भक्तीमध्ये तळून खावे लागते. पंढरपूर हे महान योगपीठ आहे. जीव भगवंता बरोबर जोडला जातो त्याला योग म्हणतात आणि जीवाला भेटायला भगवंत खाली येतो तो महायोग होय. समस्त वारकरी ज्ञानोबा तुकाराम हा गजर करीत पंढरीकडे चालले आहेत. एकाने विचारले, हे ज्ञानोबा तुकाराम हे म्हणत आहेत, यामध्ये विठ्ठल नाव कुठेच नाही. ज्या संतांनी या विठ्ठलाचे नाव झोपडी झोपडीत, घराघरात, प्रत्येकाच्या हृदयात नेऊन ठेवले. त्या संतांच्या पालख्या आपण उचलतो आणि पालख्या उचलल्यानंतर मुखातून नाव येते ज्ञानोबा तुकाराम. वारकऱ्यांच्या पायाखाली पंढरीचा रस्ता आहे. रस्ता म्हणजे ज्यामध्ये रस आहे. ज्यामुळे विठ्ठल भेटीचा आनंद आहे तो रस्ता. या पालखी सोहळ्यामध्ये दिंडीमध्ये आपल्या अविचाराची काजळी दूर होते. संतांच्या विचारांचा त्यांच्या प्रबोधनाचा आपल्याला आपल्या जीवनात अधिक उपयोग होतो. कारण त्यांच्या विचाराला आचाराचे शुद्ध अधिष्ठान असते. त्यांनी आधी विचार आचरणात आणलेले असतात. या पालखी सोहळ्यात वारकरी एकमेकांशी संवाद करतात. कोणी कोणाच्या ओळखीचा नसतो. याला योगायोग म्हणतात.

एकमेकांशी बोलून पंढरीकडे जाण्यासाठी जे सक्रिय होतात त्याला कर्म धर्म संयोग असे म्हणतात. वारी हा आपल्या जगण्याचा स्त्रोत आहे. डॉक्टर यशवंत पाठक संत साहित्यिक यांनी एक अनुभव सांगितला होता. एक९५ वर्षाचा वृद्ध विठू माऊलीच्या दर्शनासाठी सहा किलोमीटर रांगेत उभा होता. एकाने त्यांना विचारले तुमचे वय इतके असतानाही तुम्ही कशासाठी रांगेत उभे राहता त्यावेळी त्यांनी उत्तर दिले, माउली कडे जाण्यासाठी माऊलीचे दर्शन घेण्यासाठी माझे पाय अजून धडधाकट आहेत आणि मला उभे राहण्यातच माऊली भेटते. हा खरा जीवनाचा आनंद. या आनंदमय सोहळ्यामध्ये प्रत्येक जण आपले वय विसरलेला असतो. सर्वत्र आनंदाचे डोही आनंद तरंग. एकदा का या आनंदाची अनुभूती झाली की मग आपले सर्व आयुष्य एक आनंद बनून जाते व आयुष्याच्या प्रत्येक गोष्टीमध्ये आपल्याला आनंद दिसू लागतो. हा पालखी सोहळा मग आनंदाचा सोहळा बनून जातो. आता सर्व संतांच्या पालख्या पंढरीकडे निघाल्या असून हा भक्तीचा महासागर आषाढी एकादशीला पंढरीला जातो. पंढरीला गेल्यावर सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रसन्नता आनंद असतो. कारण विठ्ठलाचे दर्शन. ज्या विठू माऊली साठी मजल दरमजल करीत पंढरीला आलो त्यावेळी जो आनंद असतो तो अवर्णनीय आहे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अमोल चावंडे यांना पीएच. डी पदवी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथपाल अमोल चावंडे यांना संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती येथील विद्यापीठाने पीएचडी पदवी नुकतीच प्रदान केली आहे. या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, सचिव व कार्यकारी मंडळ, प्राचार्य डॉ. कैलास दौंडकर आदींनी अभिनंदन केले आहे.

डॉ. अमोल चावंडे यांनी आपले संशोधन कार्य महाराष्ट्रातील महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये इलेक्ट्रॉनिक डेटाबेसचा वापर आणि व्यवस्थापन : एक अभ्यास या विषयातून पूर्ण केले आहे त्याकरिता डॉ. संजय वाघ यांचे मार्गदर्शन लाभले होते. डॉ. अमोल चावंडे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये हे यश संपादन केले आहे. सातत्यपुर्ण परिश्रम व मार्गदर्शन यातून हे यश संपादन केल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून त्यांच्या यशाबद्दल शुभच्छा दिल्या आहेत. संस्थेचे सर्व पदाधिकारी व प्राचार्य डॉ. बाळासाहेब मुरादे, डॉ. कुलकर्णी, प्रा. संगीता परदेशी, डॉ. अर्जुन पिठे, प्रा. सतिष घाडगे, प्रा. सुनिल देसले, डॉ. राजु शेख, प्रा. संतोष साळवे, प्रा. राजश्री पंडित, प्रा. उर्मिला वाव्हळ व शिक्षकेत्तर कर्मचारी सचिन अमोदकर, विठ्ठल श्रुगारे, दत्तात्रय ढेपले, अविनाश कांबळे, युवराज मिसाळ, नितीन शिंदे आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# संगमनेरला कामगार रुग्णालयाच्या कामास प्रारंभ

## आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यास यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तब्बल चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या कामगार रुग्णालयाचे स्वप्न अखेर साकार होत आहे. आमदार अमोल खताळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रुग्णालयास शासनाची मंजुरी मिळाली असून शहरातील जाणता राजा मार्गावरी स्टेट बँकेच्या समोर असणाऱ्या इमारतीत या रुग्णालयाचे काम प्रत्यक्षात सुरू करण्या आले आहे. लवकरच हे रुग्णालय संगमनेर तालुक्यातील कामगारांच्या सेवेत दाखल होणार आहे या रुग्णालयाचा कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना लाभ होणार आहे.

संगमनेर तालुक्यातील कर्मचारी राज्य विमा योजने अंतर्गत येणाऱ्या कामगारांना उपचारासाठी नाशिक, अहिल्यानगर तसेच इतर शहरांमध्ये जावे लागत होते. त्यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक त्रास सहन करावा लागत होता. संगमनेरमध्येच कर्मचारी राज्य विमा योजना रुग्णालय सुरू व्हावे, यासाठी आमदार खताळ यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून या कामगार रुग्णालयाचे प्रत्यक्षात काम सुरू झाले आहे

या रुग्णालयाच्या माध्यमातून कामगारांना प्राथमिक उपचार, तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन, विविध वैद्यकीय तपासण्या, औषध उपचार तसेच इतर आवश्यक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे कामगारांना दर्जेदार, जलद आणि सुलभ आरोग्यसेवा मिळणार असून बाहेरगावी जाण्याची गरज लागणार नाही

संगमनेरच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामगारांची मागणी आता पूर्णत्वास येत असल्याने विविध कामगार संघटना, सामाजिक संस्था तसेच नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शासनाकडून मंजुरी मिळवून हा प्रकल्प मार्गी लावल्या बद्दल कामगारांनी आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहे .

### हजारो कामगारांना मोठा दिलासा

**संगमनेर शहरातील जाणता राजा मार्गावर कामगार रुग्णालय सुरू झाल्यानंतर संपूर्ण तालुक्यातील हजारो कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्याचा थेट लाभ होणार आहे. सर्वसामान्यांना अधिक सक्षम आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल. लवकरच हे रुग्णालय सुरू होऊन कामगारांच्या सेवेत दाखल होणार आहे.**

**श्री सुशील शेवाळे**
**तालुकाध्यक्ष, युवा सेना, संगमनेर**

# जिल्हा बँक निवडणुकीची धामधूम सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या मतदारांसाठी ठरावाची धामधूम सर्वत्र दिसून येत आहे. आपल्या गटाचे किंवा आपल्या पक्षाचे उमेदवार मतदार असले पाहिजे यासाठी सभासद असणाऱ्या संस्थांमध्ये अतिशय काळजीपूर्वक चौकशी आणि बांधणे चालू असल्याचे गावोगाव दिसून येत आहे. अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत कुणाची सरशी होणार यावर पदाधिकारी निश्चित केले जात असल्याने व अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँक ही राज्यातील अग्रगण्य बँक असल्याने या सर्व प्रक्रिया अतिशय गांभीर्याने राबविण्यात येत आहे. बदलत्या राजकीय समीकरणामुळे या बँकेच्या निवडणूकीकडे अवघ्या जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

# सत्यशोधक विचार मंचात 'कोकणी रानमाणूस' प्रसाद गावडे यांचे व्याख्यान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सत्यशोधक विचार मंचाच्या जाहीर व्याख्यानमालेतील आठवे पुष्प म्हणून पर्यावरण अभ्यासक, निसर्गप्रेमी आणि कोकणी रानमाणूस म्हणून लोकप्रिय असलेले प्रसाद गावडे यांचे सह्याद्रीची राखणदारी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता व्यापारी असोसिएशन हॉल, संगमनेर येथे होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सांगेली गावातील जायपेवाडी येथील रहिवासी असलेले प्रसाद गावडे यांनी अभियंता म्हणून करिअर करण्याची संधी नाकारत कोकणातील निसर्ग, ग्रामीण जीवन आणि पर्यावरण संवर्धनासाठी स्वतःला वाहून घेतले. कोकणी रानमाणूस या नावाने ते सोशल मीडिया आणि



यूट्यूबच्या माध्यमातून कोकणातील जैवविविधता, लोकजीवन, खाद्यसंस्कृती, शेती, पारंपरिक जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचवत आहेत.

इको-टुरिझम आणि होमस्टे संकल्पनेच्या माध्यमातून स्थानिक युवकांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. जंगल, पाणी, जमीन आणि स्थानिक संस्कृतीच्या जतनासाठी ते सातत्याने जनजागृती करत असून पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या अनियंत्रित विकासाविरोधातही ते ठाम भूमिका मांडतात.

राज्यातील विविध शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक व्यासपीठांवर पर्यावरण, शाश्वत जीवनशैली आणि करिअर मार्गदर्शन विषयांवर ते प्रेरणादायी व्याख्याने देतात. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना आपल्या गावात राहून निसर्गाशी सुसंगत उद्योजकता आणि रोजगार निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव विविध माध्यमांनी केला असून, दै. लोकसत्ताच्या गोष्ट असामान्यांची या मालिकेत त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाची विशेष दखल घेण्यात आली आहे.

सह्याद्रीचे पर्यावरण, जैवविविधता, निसर्ग संवर्धन आणि शाश्वत विकास याविषयी अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी विचार ऐकण्याची संधी या व्याख्यानाच्या माध्यमातून संगमनेरकरांना मिळणार असल्याने पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी या व्याख्यानाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोन्याच्या दरात मोठी घसरण

मुंबई (वृत्तसंस्था)

सोनं-चांदीच्या दरात गेल्या काही दिवसांपासून मोठे बदल होत आहे. या आठवड्यात सलग चौथ्या दिवशी सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. त्यामुळे आज सोनं खरेदीची चांगली संधी आहे. २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ७७० रुपयांची घसरण झाली आहे. २४ कॅरेटसोबत २२ आणि १८ कॅरेटच्या सोन्याच्या दरात देखील घट झाली आहे.

गुड रिटर्न्सने दिलेल्या माहितीनुसार, आज २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ७७० रुपयांची घसरण झाली. हे सोनं खरेदी करण्यासाठी ग्राहकांना १,४४,४९० रुपये खर्च करावे लागणार आहेत. तर २४ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ७७० रुपयांची घसरण झाली आहे.

सोन्याचे दागिने हे २२ कॅरेटमध्ये बनवले जातात. त्यामुळे हे सोनं खरेदीवर ग्राहकांचा भर असतो. आज २२ कॅरेटच्या सोन्याच्या दरात देखील मोठी घसरण झाली. २२ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ७०० रुपयांची घसरण झाली. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १,३३,४५० रुपये खर्च करावे लागतील. तर २२ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ७००० रुपयांची घसरण झाली आहे. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १३,२४,५०० रुपये मोजावे लागतील. २४ आणि २२ कॅरेट सोन्यापाठोपाठ आज १८ कॅरेटचं सोन्याच्या दरात देखील मोठी घसरण झाल. १८ कॅरेटचे १ तोळा सोनं ५७० रुपयांनी स्वस्त झालं आहे. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १,०८,३७० रुपये मोजावे लागतील. तर १८ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ५७०० रुपयांची घसरण झाली आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
- 24x7 Technician
- One Time Blood Tubing Use
- Modern Dialysis Centre
- Nephrologist, AVF Surgery
- Renal Dialysis
- Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथुनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा B.H.M.S., C.G.O., D.Ac होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक (३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25